REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख मे १२, १९४८ अंक १८


## वि ज य
## टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

## दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
स्थापना : १९११
चेअरमनः—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी | ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी | ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल | ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बँक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बँकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटीसाठी चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा रक्तवर्धक खुराक **आंबावडी** फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

**नं. २० साबण** बार सोप आणि वडी वापरा. माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

वर्कशॉप मशिनरी ( २ )

हेवी ड्यूटी

शिमोगा लेथ

( ८′—१०″ )

संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला

— चौकशी स्थान —

केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.


## विविध माहिती

**पेट्रोलच्या पुरवठ्यांत कपात**—ता. १ मे १९४८ पासून सुरू झालेल्या तिमाहींत, खाजगी मोटार गाड्यांना व मोटार सायकलींना मिळणाऱ्या पेट्रोलच्या पुरवठ्यांत हिंदुस्थान सरकारनें निमपटीची कपात केली आहे. एकंदर जगांतील तेलाच्या पुरवठ्याच्या अपुरेपणाचाच हा परिणाम आहे.

**रेडिओ-फोटोची सोय**—मुंबईहून लंडनला एकदम रेडिओ फोटो पाठविण्याची सोय आतां झाली आहे. त्याचा उद्‌घाटन समारंभ मुंबईचे गव्हर्नर सर महाराज सिंग ह्यांच्या हस्तें नुकताच पार पडला. हिंदुस्थान सरकारच्या, परदेशांशीं दळणवळण ठेवण्याच्या आधुनिक सोयींचाच हा एक भाग आहे. युद्धकाळांत लढकींहून परदेशीं रेडिओ-फोटो पाठविण्याची सोय करण्यांत आली होती. युद्धानंतर ही सोय नागरिकांनाहि उपलब्ध करून देण्यांत आली.

**वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—रस्त्यानें होणाऱ्या वहातुकीच्या राष्ट्रीयीकरणाबाबत सल्लामसलत देण्यासाठीं मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कमिटीला ह्या धंद्यांतील कंपन्यांचा सल्ला घेण्याची मुभा ठेवलेली आहे.

**दिल्ली—श्रीनगर विमानमार्ग**—हिंदुस्थान सरकारच्या विमान-वहातुकीचे परवाने देणाऱ्या बोर्डानें दालमिआ जैन एअरवेज लि. ह्या कंपनीला दिल्ली ते श्रीनगर विमानवहातुक करण्यास तात्पुरती परवानगी दिली आहे. प्रथम कांहीं दिवस एकच विमान ह्या मार्गावर उड्डाण करणार आहे. प्रवाशांना मैलामागें ४ आण्यांपेक्षा अधिक आकार द्यावा लागणार नाहीं. विमान वाटल्यास अमृतसर येथें उतरूं शकेल.

**ऑटोमॅटिक टेलिफोनचा कारखाना**—ऑटोमॅटिक टेलिफोन्सच्या उत्पादनाचा कारखाना हिंदुस्थानांत स्थापन व्हावयाचा आहे. त्या संबंधांत हिंदुस्थान सरकार व इंग्लंडमधील ऑटोमॅटिक टेलिफोन्स अँड इलेक्ट्रिक कंपनी ह्यांचेमध्यें एक करार झाला आहे. त्याची मुदत १५ वर्षांची आहे. त्याचे अन्वयें हिंदुस्थान सरकारास तिच्या पेटंट्सचा उपयोग करतां येणार आहे. कारखान्याच्या उभारणीस कंपनी मदत करणार आहे.

**पुण्यांतील बँक मॅनेजरांची असोसिएशन**—पुणें येथील बँकांच्या व्यवस्थापकांची एक असोसिएशन स्थापन झाली आहे. पुणें सें. को. बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री. चितळे हे तिचे अध्यक्ष असून न्यू सिटिझन बँकेचे मॅनेजर श्री. गांडेकर हे सेक्रेटरी आहेत. प्रत्येक महिन्यास एकदा, ह्या प्रमाणें असोसिएशनच्या सभा सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत होतात. ह्या असोसिएशनचें स्वरूप तूर्त स्नेहसंवर्धनापलीकडे फारसें नसलें, तरी बऱ्याच उपयुक्त कार्याचें त्यांत निश्चित बीज आहे.

**रेडिओ कार्यक्रम अधिक व्यवस्थित होणार !**—आपल्या नोकरवर्गास अधिक कार्यक्षम करण्याचे उद्देशानें ऑल इंडिया रेडिओ एक ट्रेनिंग स्कूल काढणार आहे. बी. बी. सी. च्या ईस्टर्न न्यूज सर्व्हिसमध्यें काम करीत असलेले श्री. आर. नारायण मेनन ह्यांच्या नेतृत्वाखाली तें चालेल.

**दारुबंदी प्रचाराकरितां कलापथकें नेमणें आहेत**

पूर्व खानदेश जिल्हा दारुबंदी समितीतर्फे नाटक, गाणें, कीर्तन, पोवाडा वगैरे संयुक्त कार्यक्रम करूं शकणारीं कलापथकें नेमणें आहेत. गरजूंनीं आपल्या पगाराच्या अटीसह खालील पत्त्यावर तारीख २५–५–१९४८ च्या आंत अर्ज करावेत.

म. ना. सावंत.
जिल्हा दारुबंदी अधिकारी,
पूर्व खानदेश, ( जळगांव )

### पीपल्स कॉमनवेल्थ को-ऑपरेटिव्ह कॉलनायझेशन सोसायटी लि.

### —अमृतनगर—

योजनेंतील सहकारी सामुदायिक शेती उत्तम रीतीनें होण्यासाठीं कोणकोणत्या बाबतींत सरकारी मदत पाहिजे आहे तें कळविण्याबद्दल सहकारी खात्याकडून लिहून आलें आहे.

अमृतनगर क्षेत्रांतील शेतीस उपयोगी असलेल्या जमिनीची तालबंदी शास्त्रीय पद्धतीनें करून तिची सुपिकता वाढविणें व टिकविणें यासाठीं त्याचप्रमाणें योजनेशीं आपलेपणानें सहकार्य करून सहकारी शेतीवर कष्ट करणाऱ्या कुटुंबाचें जीवन सुखी व समृद्ध असें रहाण्यासाठी कोणत्या सोयी व कशी व्यवस्था असणें आवश्यक आहे याबद्दल दूरदृष्टीनें विचार करून आल्या गरजा निश्चित स्वरूपांत मांडणें अवश्य आहे.

अमृतनगर योजनेच्या क्षेत्रांतील व क्षेत्राच्या बाहेरील जमिनीवर आपल्या निर्वाहासाठीं स्वकष्टानें शेती करणाऱ्यांपैकीं ज्यांना अमृतनगर-मध्यें सहकारी तत्त्वांवर सामुदायिक अगर वैयक्तिक शेती स्वकष्टानें करण्याची इच्छा आहे त्यांच्याबरोबर विचारविनिमय करून त्यांच्या गरजा काय आहेत व त्यांना कोणत्या गोष्टी खपतील, पचतील व मानवतील हें निश्चितपणें समजून घेणें अगत्याचें आहे.

या करितां कॉलनायझेशन सोसायटीच्या सभासदांची व अमृतनगर-मध्यें स्थापन व्हावयाच्या सहकारी शेतीवर सोसायटीचे सभासद होऊन स्वकष्टानें शेती करण्याची ज्यांची इच्छा आहे अशा मंडळींची खासगी स्वरूपाची प्रास्ताविक सभा शुक्रवार तारीख १४ मे १९४८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां २९२ सदाशिव पेठ, पुणें २ येथें भरेल. ज्यांना सभेस येणें सोयीचें नसेल त्यांनीं आपल्या सूचना लेखी पाठविल्यास बरें होईल.

अमृतनगरच्या क्षेत्रांत आज स्वकष्टानें शेती करणाऱ्यांपैकीं जी मंडळी ३१ मे १९४८ अखेरच्या आंत कॉलनायझेशन सोसायटीचे सभासद होऊन पूर्णपणें सहकार्य करण्यास तयार असतील त्यांच्याकरतां शेतीसाठीं सुधारलेल्या जमिनीचा जरूर तितका भाग पहिल्याप्रथमच राखून ठेवून बाकीच्या जमिनीवर शेती करण्यास योग्य अशी मंडळी बाहेरचीही घेण्यांत येतील.

त्याचप्रमाणें लँड ॲक्विझिशन कायद्याखालीं नोटिसा ज्यांना मिळाल्या आहेत अगर मिळावयाच्या आहेत अशा जमीन मालकांपैकीं जे ३१ मे १९४८ पर्यंत कॉलनायझेशन सोसायटीचे सभासद होऊन अमृतनगराच्या उभारणींत आपलेपणानें सहकार्य करतील त्यांच्यासाठीं भावी बाजारपेठेंतील कांहीं भाग योग्य अशा शर्तीवर राखून ठेवण्यांत येईल.

मे ८, १९४८ शंकर रामचंद्र भागवत.


—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२९२, बुधवार पेठ, हमदेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १२ मे १९४८



प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु.   किरकोळ अं. २ आणे.

## आतां चलनवाढ व महागाई कां ?

### सरकारी भांडवली खर्चाच्या धोरणाचा एक अपरिहार्य परिणाम

आर्थिक परिस्थितीचा युद्धविषयक पाया आतां उरला नसला, तरी समाजाचें एकूण उत्पन्न व खर्च ह्यांत अद्याप घट झालेली दिसत नाहीं; उलट त्यांत वाढच झालेली आहे. त्या कारणानें किंमती एकसारख्या वाढत चालल्या आहेत. लष्करी खर्चाचें मान कमी झालें म्हणजे येणाऱ्या आर्थिक आपत्तींस तोंड देण्यासाठी आणि बेकारीस आळा घालण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें व प्रांतिक सरकारांनीं पुनर्घटनेच्या प्रचंड योजना मागेंच आंखल्या आणि त्यासाठी मोठाल्या रकमाहि मंजूर केल्या. मात्र, ह्या योजना ज्या परिस्थितीच्या अपेक्षेनें आंखल्या ती परिस्थिति मात्र आज दिसून येत नाहीं; तरी पण हातीं घेतलेल्या पुनर्घटनेच्या योजना तडीस नेण्याचा सरकारी प्रयत्न कायम चालू आहे; त्यास पडणाऱ्या आर्थिक किंमतीकडे दुर्लक्ष्य केलें जात आहे. कर्जें काढून आणि तूट सोसून योजनांचे कार्यक्रम चालू आहेत. योजनांच्या खर्चाचा शक्य तेवढा मोठा भाग चालू उत्पन्नांतून भागविणें इष्ट असतांहि चलनविस्तारास व महागाईस कारणीभूत होणाऱ्या मार्गाचा अवलंब केला जात आहे. यंत्रसामुग्री, कच्चा माल आणि तज्ज्ञ कारागीर ह्यांचें आज दुर्भिक्ष्य असतांना, सरकारी योजनांना ते मिळविण्यासाठी बाजारांत जास्त पैसे देऊं करून स्पर्धा करावी लागत आहे. खासगी मागणीस नियंत्रण घातलें नाहीं, तर चलनवृद्धीस पोषक असाच सरकारी खर्च चालू रहाणें ह्यामुळें अपरिहार्य होतें. टप्प्या-टप्प्यानें नियंत्रणें काढून टाकण्याच्या धोरणाचे चौकटींत सरकारी खर्चाचा विपुल पैसा खेळूं लागला तर निर्माण होणाऱ्या अवस्थेमधील धोक्यांची कल्पनाहि करवत नाहीं. टाटा कार्टेलीच्या ताज्या अंकांतील अग्रलेखानें सरकारी पुनर्घटनेच्या योजनांच्या परिणामांचें चित्र वरील प्रमाणें मोजक्या परंतु असंदिग्ध शब्दांत रेखाटलें आहे.

### बंदिस्त फंडांचें चलनांत रूपांतर

हिंदुस्थान सरकारच्या एकूण वार्षिक खर्चाच्या आंकड्यानें १९४४–४५ सालीं उच्चांक गांठला; त्याबरोबरच उत्पन्न आणि कर्जें ह्यांचाहि आकडा आश्चर्यकारक गतीनें वाढला. १९४३–४४ च्या घटीचें १९४५–४६ मध्यें मोठ्या वाढाव्यांत रूपांतर झालें आणि त्याचा सुपरिणाम बाजारभाव कांहींसा स्थिर रहाण्यांत झाला. उत्पन्न–खर्चामधील अनुकूल तफावत अशीच ह्यापुढें कायम राहील, ही अपेक्षा मात्र सपशेल चुकली. उत्पन्नाच्या बाबी आटल्या तरी भांडवली खर्च मोठ्या प्रमाणावर कायमच चालू राहिला. सरकारास कर्जें मिळणेंहि सोपें गेलें नाहीं. चलनवाढ होऊनहि, सरकारकडे पैसा येण्याऐवजीं खासगी धंद्यांत गुंतवणुकीसाठी किंवा खर्चासाठी तो उपयोगांत येऊं लागला. "चलनविस्ताराचे काळांत सरकारी अंदाजपत्रकें केवळ तोंडमिळवणीच करणारीं असून भागत नाहीं; जनतेजवळील क्रयशक्तीस आळा घालून व काटकसरीस उत्तेजन देऊन अंदाजपत्रक शक्य तेवढ्या मोठ्या वाढाव्याच असणें अत्यावश्यक आहे. फाजील चलनी नोटा दुर्मिळ वस्तूंच्या शोधांत फिरत राहूं न देणें सद्यःस्थितींत जरूर आहे." १९४८–४९ च्या अंदाजपत्रकी भाषणांत अर्थमंत्र्यांनीं प्रतिपादन केलेलें हें तत्त्व त्यांच्या प्रत्यक्ष योजनांत आढळत नाहीं, असें टाटा कार्टेलीनें प्रतिपादन केलें आहे, आणि तें करतांना मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं १९४८–४९ मध्यें केवढ्या मोठ्या भांडवली खर्चास मान्यता दिलेली आहे, ह्याची आकडेवारी दिली आहे. सुमारें १८६ कोटींचा खर्च खेळतें चलन आंखडून घेऊन भागविण्यांत येणार नसून, फंडांच्या शिल्लकी रकमांतून त्या खर्चाची तरतूद करण्यांत येणार आहे. म्हणजे, जें साधन आज पैसा ह्या स्वरूपांत नव्हतें, तें पैसा म्हणून व्यवहारांत खेळूं लागणार आहे. त्या प्रमाणांत चलनविस्तार घडून येणार आहे. सरकारी फंडांच्या रकमा रिझर्व्ह बँकेजवळ ठेवलेल्या असतात, त्या खर्चासाठी उपलब्ध करावयाच्या म्हटल्या म्हणजे बँकिंग खात्यांतील चलनी नोटा आधी काढून घ्यावयाच्या व त्याहि अपुऱ्या पडल्या म्हणजे नव्या नोटा छापावयाच्या, अशी ही परंपरा आहे. प्रांतिक सरकारांचे फंड बहुंशीं सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. त्याचे पैसे करावयाचे म्हणजे कांहीं रोखे विकले पाहिजेत. इकडे, मध्यवर्ती सरकारचा १५० कोटींचें नवें कर्ज काढण्याचा संकल्प आहे. तेव्हां, रोख्यांचे भाव पडल्याखेरीज रोखे बाजारास हें सर्व पचनीं पडणार नाहीं. अखेर नवें चलन प्रसृत करून रिझर्व्ह बँक प्रांतिक सरकारांस रोख रकमा उपलब्ध करून देईल, असेंच व्यवहार सांगतो.

### सरकारी ठेवींत उतार व चलनविस्तार

सरकारी ठेवींत उतार आणि चलनविस्तार ह्यांचा निकटचा संबंध चित्रित करणारा तक्ता टाटा कार्टेलीनें तयार केला आहे तो उद्बोधक आहे. "सरकारनें पूर्वी बचत करून फंडांत टाकलेले पैसे उपयोगांत आणणें हें अगदी निरुपद्रवी भासतें; परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र त्याचा परिणाम नव्या चलनी नोटा छापण्यांत आणि त्याच्या जोरावर स्पर्धा करणारांस दूर सारण्यांत होतो" असा स्पष्ट निष्कर्ष टाटा कार्टेलीनें काढला आहे. युद्धसमाप्तीनंतर सुमारें दोन वर्षेंपर्यंत, चलनास आधार असलेल्या रिझर्व्ह बँकेजवळील हिंदी सरकारी रोख्यांची किंमत एक पातळीवर स्थिर होती. चलनविस्ताराच्या आधाराच्या ह्या रोख्यांत आतां वाढ होत चालली आहे. अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करण्यासाठी किंवा रोखे बाजारांत विश्वासाचें वातावरण राखण्यासाठी सरकारी रोख्यांचे तारणावर चलन प्रसृत करणें ही नित्याची बाब होऊन बसली, तर सरकारनें किती चलन काढावें ह्यास मर्यादाच उरणार नाहीं ! टाटा कार्टेलीनें सरकारच्या भांडवली खर्चावर केलेली ही टीका योग्य शब्दांत अशीच असून चालू परिस्थितीची ती पूर्णपणें कल्पना करून देणारी आहे.

---

## कापडाच्या महागाईची चौकशी

### गिरणीवाल्यांचा खुलासा

कापडाच्या वाढीच्या किंमतींबाबत हिंदी टारिफ बोर्ड, कमॉडिटीज प्राइसेस बोर्ड रद्द झाल्याकारणानें, चौकशी करीत आहे. "खरेदीदारास भरमसाट किंमत द्यावी लागत नाहीं ह्याबद्दल सरकारची व जनतेची खात्री पटली पाहिजे; मनुष्याच्या संसारांत कपड्यावरील खर्च हा अन्न खर्चाच्या खालोखाल येतो. सूत व कापड ह्यांच्या उत्पादनास खरोखर किती खर्च येतो हें पहाणें प्रस्तुत चौकशीचें काम आहे" असा खुलासा टारिफ बोर्डाचे अध्यक्ष, श्री.जी. एल. मेहता ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत केला. श्री. कस्तुरभाई लालभाई ह्या अहमदाबादच्या गिरणी मालकानें सांगितलें, कीं कापडाच्या सध्याच्या भरमसाट महागाईस गिरणीमालक जबाबदार नाहींत. कित्येक गिरणीवाल्यांनीं योग्य दरानें (पूर्वीपेक्षां ४०% ते ५०% जास्त) कापड पुरविण्याचा प्रयत्न केला, परंतु पुष्कळ लोक त्या दरानें कापड घेऊन तें काळ्या बाजारांत विकतात. गिरणीमालकांच्या योग्य किंमतीचा अखेरच्या गिऱ्हाइकास फायदा कसा मिळेल तें बोर्डानें सुचवावें, अशी श्री. कस्तुरभाईंनीं विनंती केली. हिंदुस्थानांतून पाकिस्तानकडे जाणाऱ्या कापडाच्या प्रवाहास आडकाठी करण्याची शिकस्त करावी, असेंहि त्यांनीं सुचविलें.

### कामगारांचा दृष्टिकोन

कामगार संघांच्या प्रतिनिधींनीं प्रतिपादन केलें, कीं कापडाची वाजवी किंमत ठरवितांना भांडवलावरील योग्य व्याजाप्रमाणेंच कामगारांची योग्य मजुरीहि विचारांत घेतली जावी. कापडाच्या जातींची संख्या कमी करावी आणि तलम कापडाचें उत्पादन बंद करावें; निदान तें कमी करावें. सध्याच्या कठीण परिस्थितींत, कापड मुख्यतः टिकाऊ असावें आणि त्याच्या बनावटींत हिंदी कपासच वापरण्यांत यावी. ब्रिटिश लोक जर कापडाच्या वापराचें बाबतींत गैरसोय सोसूं शकतात, तर आपण विदेशी कपास खरेदी करून तलम कापडाचें उत्पादन करण्याची काय आवश्यकता आहे? कापडाचें उत्पादन घटण्याचें कारण कामाचे कमी केलेले तास हें नसून स्टोर्सचा तुटवडा हें आहे. गिऱ्हाइकाला छापील दरानें कापड मिळणार नसेल, तर कापडावर नुसती त्याची किंमत छापून काय उपयोग?

### भागीदार काय म्हणतात ?

बॉंबे शेअर होल्डर्स असोसिएशनच्या सेक्रेटरीनें गिरण्यांच्या भागिदारांचा दृष्टिकोन टारिफ बोर्डापुढें मांडला. मॅनेजिंग एजन्सीचे करार नव्यानें करतांना त्यांचें कमिशन कमी करण्यांत यावें, असें त्यांनीं सुचविलें. मॅनेजिंग एजंट हेच स्वतः विक्रेते-एजंट असल्याकारणानें काळा बाजार फार सुलभ होतो. कापडाच्या ज्या किंमतीमुळें भांडवल गिरण्यांकडे आकर्षिलें जाईल व उत्पादन वाढेल, अशीच किंमत बोर्डानें सुचवावी, असें ते म्हणाले. १०% (करास पात्र) किंवा ६% (करमाफ) एवढें व्याज गुंतविणारास पडावें.

### व्यापाऱ्यांना फेअर प्राइस शॉप्स नकोत

कापडाच्या व्यापाऱ्यांचा, गिरणी मालकांच्या फेअर प्राइस शॉप्सना विरोध आहे. अशीं दुकानें काढण्याचा हेतु जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकून जादा २०% नफा काढणें हा आहे, असें बोर्टास व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधीनें सांगितलें. हातगाडीवाले लोक व निर्वासित अशा दुकानांत माल खरेदी करून तो नफेबाजीनें सऱ्या गिऱ्हाइकांस विकतात. गिरणी ते गिऱ्हाइक व्यापारावर गिरणी मालकांचीच सत्ता चालत आहे. अहमदाबादमधील गिरण्यांचे तर विक्रेते एजंट नेमलेले आहेत त्यांना ३/४% ते १% विक्रीवर कमिशन मिळतें.

### कपास पेरणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला

हिंदी कपास-शेतकऱ्यांच्या बाजूची वकिली सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं केली. जागतिक किंमती व कपाशीची परिस्थिती लक्षांत घेतां हिंदी कपाशीची किंमत बिलकुल भरमसाट नाहीं असें तें म्हणाले. कापडाचा उत्पादन-खर्च कमी राखण्याचे, कपाशीची किंमत मर्यादित करण्याव्यतिरिक्त इतरहि अनेक मार्ग आहेत.

### गिऱ्हाइक काय म्हणतें ?

कित्येक गिरण्या इतकीं वर्षें नुकसानींत होत्या, त्यांनीं पुष्कळ नफा मिळवला आहे; तेव्हां त्यांचे नफे आतां कमी झाले म्हणून काय बिघडलें ? नियंत्रण पद्धतीमुळें कित्येक अनिष्ट प्रकारांस चालना मिळाली, तरी तुटवडा चालू आहे तोंपर्यंत नियंत्रणच—अधिक कार्यक्षम नियंत्रण—बरें, असें गिऱ्हाइकांचे वतीनें श्री. बाबूभाई पटेल ह्यांनीं प्रतिपादलें. सहकारी सोसायट्यांतर्फे कापड वाटप करण्यांत आलें तर फारच उत्तम.

### मुंबई सरकारचा प्रयत्न

सध्याच्या भरमसाट दरानें जनतेनें कापड विकत घेऊं नये; कांहीं वेळ वाट पहावी; किंमती कमी राखण्याची एक योजना सरकारपुढें आहे, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

## गांधी फंडाची सहकारी संस्थांत गुंतवणूक

संपादक "अर्थ" ह्यांस सा. न. वि. वि.

डॉ. राजेंद्रप्रसाद, अध्यक्ष, महात्मा गांधी मेमोरियल फंड कमेटी, यांना मेमोरियल फंडाच्या पैशापैकीं कांहीं हिस्सा सहकारी बँका व सोसायट्या यांमध्यें गुंतवण्यासंबंधीं मी लिहिलें आहे. या पत्रांतील मजकूर खालीलप्रमाणें आहे.—

प्रत्येक प्रांतांतील जमा झालेल्या मेमोरियल फंडाच्या निधीपैकी तीन चतुर्थांश रकम त्याच प्रांतासाठी खर्च करण्याच्या आपल्या सूचनेचें मी स्वागत करतों. मी याबाबत असें नम्रपणें सुचवूं इच्छितों कीं या फंडापैकीं कांहीं रकम, ज्यांची आर्थिक परिस्थिति मजबूत आहे अशा सहकारी बँका व इतर सहकारी संस्था ह्यामध्यें गुंतवावी. किंबहुना पैसा ठेवण्याच्या बाबतींत त्यांना प्राधान्य देण्यांत यावें. ह्या बँका व सोसायट्या सहकारी खात्याच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालीं असल्यामुळें, त्यांच्या आर्थिक परिस्थितीसंबंधी पूर्ण माहिती त्या खात्याच्या रजिस्ट्रारसाहेबांकडून मिळविणें कठीण नाहीं. सहकारी संस्थांना त्यांच्या विविध उद्योगधंद्याकरितां दीर्घ व अल्प मुदतींच्या ठेवींची गरज असते. प्रांतांतल्या या एकूण सहकारी संस्था कमीत कमी दोन दोन कोट रु. आपल्या धंद्यांत गुंतवूं शकतील याची मला खात्री वाटते. मेमोरियल फंडाची गुंतवण फक्त सरकारी रोख्यांत न करतां ती विविध प्रकारची असावी. त्याचा कांहीं भाग सात ते पंधरा वर्षें मुदतीच्या व ३½ ते ४% पर्यंतच्या व्याजाचे दरानें ठेवींच्या रूपांत सहकारी बँका व सोसायट्या यामध्यें विभागावा.

काँग्रेसचें उद्दिष्ट सहकारी प्रजासत्ताक राज्य स्थापावें हें आहे आणि म्हणून गांधी मेमोरियल फंड, सहकारी बँका व इतर सहकारी सोसायट्या ह्यांचेमध्यें ठेवींचे रूपानें ठेवला जावा, कीं जेणेंकरून असल्या संस्थांना अल्प व्याजाचे दरानें पैसा मिळून त्या आपल्या धंद्याची प्रगति करूं शकतील.

जी. ए. भोंसुले

नागपूर शहर } चेअरमन, दि सी. पी. अँड बेरार प्री. को.
४ मे, १९४८ } हौसिंग सोसायटी लि.

## दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

मे. चेअरमन बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., यांचें १ मे, १९४८ रोजीं भरलेल्या ४ थ्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण खालीं दिलें आहे:—

### १९४७ मधील कारभार

गेल्या बारमाहींतील अत्यंत प्रतिकूल व अडचणीच्या परिस्थितींतही, मोठा आनंद व अभिमान वाटतो कीं, १९४६ सालापेक्षां हें साल बँकेच्या उन्नतीच्या दृष्टीनें प्रगतिपर व लाभदायकच झालें आहे. १९४६ च्या ऑगस्ट महिन्यानंतर तंबाकू व गूळ या व्यापारांतील तीव्र मंदीमुळें व इतर बाजारांतील भरमसाट तेजीमुळें आत्यंतिक ओढाताण निर्माण करणारी नाणेंभीड उत्पन्न झाली व यानंतर हळूहळू धान्य, साखर व कापड यांचेवरील नियंत्रण उठलें. यामुळें व्यापार पुन्हां सरकारच्या हातांतून खासगी व्यापाऱ्यांचे हातांत आला. यामुळें चालू खात्यांतील थोड्या ठेवी, आपली बँक मुख्यतः व्यापारी वर्गाच्या आश्रयाखालीं असल्यानें, कमी होणें अपरिहार्य होतें. परंतु ही उणीव सेव्हिंग व मुदतबंद ठेवी योग्य प्रमाणांत वाढल्यामुळें फारशी भासली नाहीं. अथापि खेडोपाडीं असलेल्या आपल्या मोठ्या समाजाला बँकेचें महत्त्व अवगत नसलेमुळें पुष्कळसें उपयुक्त भांडवल अदृष्य स्वरूपांत पडून राहिलें आहे. निरनिराळ्या जवळपासच्या खेडोपाडीं आपल्या बँकेचा प्रचार जलद होण्याचे दृष्टीनें जाहिरात व इतर उपलब्ध साधनांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करणें जरूर आहे.

### तुलनात्मक प्रगति

बँकेच्या बिझिनेसच्या दृष्टीनें बँकेच्या सर्व शाखा म्हणजे, कोल्हापूर, शाहुपुरी, सांगली, जयसिंगपूर व मिरज प्रगतिपथावरच आहेत हें खालील तुलनात्मक तक्त्यावरून दिसून येईलः—

| | १९४३-४४ रु. | १९४५ रु. | १९४६ रु. | १९४७ रु. |
|---|---|---|---|---|
| एकूण प्राप्ती | ४४,०७८ | ५०,८०० | १,२२,८३७ | १,३९,३५३ |
| वजा एकूण खर्च | २२,६२५ | २४,३०६ | ८१,२४६ | ८९,९५४ |
| निव्वळ नफा | २१,४५३ | २६,४९४ | ४१,५९१ | ४९,३९९ |

आपल्या हातांतील ताळेबंदांतील सुमारें बत्तीस लाख रु. खेळत्या भांडवलावर सुमारें १,३९,००० रु. इतका एकंदर नफा झाला आहे. यावरून नफ्याचें प्रमाण शेकडा ४⅓% प्रमाणें पडल आहे व १½% निव्वळ नफा म्हणून योग्य त्या विभागणीसहित आपल्या सेवेसी नम्रपणें रुजू केला आहे.

### दूरदर्शीपणाचें धोरण

देशांतील एकंदर परिस्थिति धामधुमीची झाली व यामुळें बाजारांत वारंवार जी चलबिचल निर्माण होत असे ती लक्षांत घेऊन डायरेक्टर बोर्डानें आपल्या धोरणांत दूरदर्शीपणानें बदल करून कर्ज देणें व दिलेल्या कर्जाबद्दल जागरूक रहाणें वगैरे बाबतींत अत्यंत दक्षता घेतली. यामुळें १९४७ साल हें कुठेंही न अडकतां सुरक्षितपणें पार पडलें आहे व हेंच धोरण चालू सालचा धंदा करतांनाही आम्हीं अत्यंत कसोशीनें पाळलें आहे. आपण नेमलेल्या डायरेक्टर बोर्डांतील सभासद कार्यतत्परतेनें व उत्साहानें बँकेच्या कामकाजांत लक्ष घालीत आहेत याबद्दल आनंद वाटतो.

### जोखमीची परिस्थिति व जागरूकपणाची आवश्यकता

देशांतील एकंदर आर्थिक परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करतां परिस्थिति सुरक्षित वाटत नाहीं. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर शांतता, सुबत्ता, भरभराट व उन्नति येईल असें जें वाटत होतें ती आशा थोडी दूरच झाल्यासारखी वाटते. युरोपांतील वातावरण शांततेचें नाहीं. काश्मीर व हैद्राबादसारखे महत्त्वाचे प्रश्न अद्याप समाधानकारक रीतीनें सुटलेले नाहींत; बाजारांत नाणेभीड असतांनासुद्धां हळद, शेंग, साखर, धान्य, कापूस, सोनें, चांदी, कापड वगैरेंचे बाजार भरमसाट वाढलेले आहेत. शेतकरी व मध्यम वर्गाला राहणीचें मान कठीण झालें आहे. करांचा बोजा सारखा वाढत आहे. मजूर व गिरणीमालक यांचें फारसें पटेनासें झालें आहे व हीच परिस्थिति इतर धंद्यांतील मालक व नोकरवर्गांत निर्माण झाली आहे. युद्धकाळांत फार नफा अनेकांना मिळवितां आला; यापुढें तो तसाच मिळत राहण्याची व लहानसान व्यापाऱ्यांनाही आपण मोठा व्यापारी होण्याची सुखस्वप्नें पडूं लागलीं आहेत. या अवस्थेंत ते अनेक बँकेकडे कॅश-क्रेडीटची मागणी करूं लागले आहेत. परिस्थिति जोखमीची झाली आहे. अशा परिस्थितींत काळाचा ओघ पाहून बँकेनें अत्यंत सावधान व जागरूक राहिले पाहिजे.

### इमारतीचा संकल्प

बँकेची प्रगति स्थिर पायावर उभारण्यासाठी बँकेच्या इमारतीसाठी सांगली येथें मध्यवस्तींत व सर्व तऱ्हेनें सोईस्कर असा बावीसशें चौरस फुटांचा एक प्लॉट रुपये ४,४०० ला विकत घेतला असून लवकरच त्यावर इमारत बांधण्याचा आम्हीं संकल्प केला आहे.

### शेड्यूल्ड बँक होणार

विलीनीकरण व हिंदी संघराज्यांत सामील होणें यामुळें बँकेच्या कारभारावर इतःपर रिझर्व बँक ऑफ इंडियाची देखरेख राहणार आहे. त्याचप्रमाणें बँकेचें कामकाज कितीही उल्लेखनीयतेनें चाललें तरी परपेठांच्या मोठमोठ्या कंपन्यांतून बँक शेड्यूल्ड झाल्याशिवाय बँकेची इभ्रत व मान वाढत नाहीं. तेव्हां तो दर्जा बँकेस लाभून देणेसाठी बँकेचें वसूल झालेलें भांडवल पांच लाखापर्यंत वाढून बँकेचे हिशेब रिझर्व बँकेकडे नोंदवून नजिकच्या भविष्यकाळांत ती शक्य तितक्या लवकर शेड्यूल्ड करणें क्रमप्राप्त आहे. नवीन शेअर्स विक्रीस काढल्यास ते खपण्यास अडचण येणार नाहीं, असा मला आत्मविश्वास वाटत आहे.

---

### दंगल-पीडित व्यापाऱ्यांस मदत

दक्षिण महाराष्ट्रांतील दंगल-पीडितांना पुनः त्यांच्या स्वतःच्या पायांवर उभें रहातां यावें, ह्यासाठी मुंबई सरकारनें कर्जाची योजना आखली आहे. जास्तींत जास्त २५ हजार रु. कर्ज, ३½% व्याज, पहिल्या वर्षी व्याज माफ, परतफेडीसाठी ७ ते १० वर्षांची मुदत, गहाणपत्रें अगर जामिनक्या, वगैरे बाबी त्यासंबंधांत जाहीर झाल्या आहेत. मुंबई सरकारच्या ह्या योजनेचें सर्वत्र स्वागत केलें गेलें; परंतु गरजू व्यापारी-कारखानदारांच्या दृष्टीनें ह्या अटी बऱ्याच ढिल्या केल्या जाणें अगत्याचें आहे, असा अनुभव येत आहे. कांहीं किमान रकम बिनव्याजी व बिन परतफेडीची मिळावी, जामिनकीबाबत अगदीं काटेकोरपणा नसावा, परतफेडीची मुदत वाढवावी, निदान पहिलीं ५ वर्षे व्याज नसावें, कारखानदारांनीं आपद्ग्रस्त व्यापाऱ्यांना माल पुरविण्यांत अग्रस्थान द्यावें म्हणजे त्यांचा धंदा लवकर सुरू होऊन जम बसूं शकेल, वगैरे सुधारणा सुचविल्या जात आहेत. मध्यमवर्गीय व्यापाऱ्यांची कुचंबणा दूर होण्याचे दृष्टीनें त्यांच्या अडचणींकडे सत्वर लक्ष पुरवलें जाणें अगत्याचें आहे.

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्यु. कं. लि., मंजुमेल
(वार्षिक सभा: ५ जून, १९४८)

ओगले बंधू लि., ओगलेवाडीच्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें १९४७ सालीं ४,७०,००० रुपयांचें उत्पादन केलें. कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें कारखान्याची उत्पादन-शक्ति पूर्णपणें उपयोगांत आणतां आली नाहीं. ठोक नफा १,२०,४५८ रु. झाला. व्यवस्था व ऑफिसखर्च, मॅनेजिंग एजन्सी अलावन्स व कमिशन, बोनसची तरतूद, घसारा, कर, इत्यादि वजा जातां निव्वळ नफा ६,३४९ रु. उरतो. त्यांत शिलकी नफा ११,५३२ रु. मिळवला म्हणजे नफा-तोटा खातीं १७,८८१ रु. येतात. ही रकम पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत यावयाची आहे. शीट ग्लास फॅक्टरीच्या उभारणीचें काम चालू आहे. त्याच्या यंत्रसामुग्रीची बेल्जममधून रवानगी एप्रिल, १९४८ अखेर बहुधा झाली असेल आणि ती हिंदुस्थानच्या मार्गावर असेल. भाग भांडवलापैकी सुमारें ५ लक्ष रु. शीट ग्लास प्लँटसाठीं वापरण्यांत येत आहेत. ते आज किफायतशिर नसले तरी उत्पादनास प्रारंभ झाला म्हणजे नफ्याचें प्रमाण पुष्कळच वाढेल, हें उघड आहे.

---

### श्री लक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर

वरील कंपनीनें ३० एप्रिल, १९४७ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें ६ लक्ष रुपयांचें सूत वगैरे विकलें आणि ८५,७२१ रु. निव्वळ नफा मिळविला. त्यामध्यें मागील शिलकी नफा मिळविला म्हणजे ८९,९८२ रु. होतात. त्यांत घसारा धरलेला नाहीं. कंपनीनें त्यांतून १२½ हजारांचा सर्व प्राथमिक खर्च व २४½ हजारांचें सर्व अंडररायटिंग कमिशन काढून टाकलें. ६¼% क्यु. प्रे. शेअर्सना १८,७५० रु. व ऑर्डिनरी शेअर्सना ५% दरानें २५,००० रु. डिव्हिडंड दिलें व ५,००० रुपयांचा घसारा फंड निर्माण करून ४,२७१ रु. पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढले. अहवालाचे वर्षी गिरणीचे कामांत बरीच सुधारणा झाली. कंपनीस आणखी ३,९२२ चात्यीं व ९५ माग बसविण्याची परवानगी मिळाली आहे. कांहीं यंत्रसामुग्री कारखान्यांत येऊन पोचलीहि पण आहे. कंपनीचें वसूल भांडवल ८½ लक्ष रुपये आहे व तिचेकडे ३ लक्ष, ६० हजारांच्या ठेवी आहेत. कंपनीनें ५ लक्ष रुपयांचे नवे शेअर्स विक्रीस काढले आहेत. विद्यमान भागीदारांस ते प्राधान्यें करून मिळतील व बाकी राहिलेले शेअर्स इतरांना उपलब्ध होतील. सरदार के. आर. विंचुरकर हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून दि भोर मर्कंटाइल एजन्सी लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. डायरेक्टर बोर्डांत श्री. हरिहर रामकृष्ण करंदीकर, श्री. दत्तोपंत फाटक, श्री. म. रा. साठे, वगैरे मंडळी आहेत. कंपनीची वार्षिक सभा भोर येथें ता. १६ डिसेंबर रोजीं झाली.

---

### दि औंध म्युच्युअल लाइफ अॅ. सोसायटी लि., पुणें
(वार्षिक सभा: ता. २३-५-४८)

वरील विमा कंपनीनें १९४७ सालीं ५,४५,५०० रुपयांच्या, ३०,५०० रु. हप्ते देणाऱ्या ३६० विमा पॉलिसी दिल्या. खर्चाचें प्रमाण पूर्वीप्रमाणेंच त्याच्या केलेल्या तरतुदीच्या मर्यादेंत राहिलेलें आहे. अहवालाचे वर्षी विमा खातीं फंडांत ५१,९४७ रुपयांची भर पडून तो २,०६,३८६ रु. झाला. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वि. गो. जोशी हे गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमधील विमा व्यवसायाचें निरीक्षण करण्यासाठी त्या देशास स्वखर्चानें जाऊन भेट देऊन आले. त्यांच्या अभ्यासाचा व अनुभवाचा फायदा कंपनीस मिळत आहे, आणि तेथील कार्यपद्धति ते स्वतःच्या कंपनींत सुरू करीत आहेत.


# दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था यांचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

# नवीन पुष्कळ निघाले, तरी तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,९४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एम. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## ज्वाला बँकेच्या अध्यक्षांचा खुलासा

ज्वाला बँक लि. ला १२ एप्रिल, १९४८ पासून नव्या ठेवी स्वीकारण्याची हिंदुस्थान सरकारनें मनाई केल्याचें वृत्त मागेंच प्रसिद्ध झालें आहे. बँकेचे चेअरमन श्री. ज्वालाप्रसाद, ह्यांनीं त्यासंबंधीं खालीलप्रमाणें खुलासा प्रसिद्ध केला आहे:—

"ठेवी परत मागणारांची गर्दी होणें, हा प्रस्तुत घटनेचा स्वाभाविकच परिणाम आहे. बँक कितीहि मजबूत असली, तरी ती सर्वांचे पैसे मागणीसरशी कधींच परत करूं शकत नाहीं, असा जगांतील बँकिंगचा इतिहास सांगतो. ठेवी किफायतशीर गुंतविणें, हें तर बँकिंगच्या धंद्याचें मर्म. ह्या गुंतविलेल्या सर्व पैशाचें रोखींत तातडीनें रूपांतर कसें होणार ? थोडी सवड दिली, तर बँक आपलें सर्व देणें भागवूं शकेल. बँकेच्या चालकांनीं आपल्या बहुतेक ठेवी काढून घेतल्या, अशा खोट्या कंड्या बँकेचे शत्रू पसरवीत आहेत. बँकेकडे एकूण ९९ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. त्यांपैकीं फक्त ६ लक्ष, ५५ हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. त्यांपैकीं एक पैहि डायरेक्टरांना दिलेली नाहीं. बाकीची रकम मागील ताळेबंदाप्रमाणें खालील प्रमाणें गुंतविलेली आहे:-

| | |
|---|---|
| रोख | ७,६५,४८९ रु. |
| इतर बँकांचे खात्यावर | १४,८५,४८९ रु. |
| सरकारी रोखे | २५,२०,९५७ रु. |
| लिमिटेड कंपन्यांचे भाग | ५७,००,८२० रु. |

"ह्या शेवटच्या गुंतवणुकीबद्दल आतां दोष काढण्यांत येत आहे. अशी गुंतवणूक कंपनी कायद्यास धरून आहे आणि गेल्या ४ वर्षांच्या ताळेबंदांत ती दिसतच आहे. सरकारला व भागीदारांना ती माहीतच होती. १३ लक्ष, ३३ हजारांच्या वसूल भांडवलापैकी उत्पादकांचें भांडवल ४ लक्ष रुपयांचें आहे आणि ते आपला स्वतःचा पैसा गोत्यांत खासच आणणार नाहींत. लिमिटेड कंपन्यांच्या शेअर्समधील गुंतवणुकीनें गेल्या ४ वर्षांत बँकेस २० लक्ष रु. नफा दिला आहे. मीं माझ्या स्वतःचा गेल्या ८ वर्षांचा पगार (१,९२,००० रु.) घेतलेला नाहीं. माझ्या काळजीकाट्याच्या कारभारामुळें बँक ३६,००० रु. खर्चून दरसाल ७ लक्ष रु. नफा मिळवीत आहे. १२ एप्रिलपासून २४ एप्रिलपर्यंत बँकेनें १५ लक्ष रु. दिले आहेत. ठेवीदारांना विनंति आहे, कीं त्यांनीं व्यवस्थापकांची अडचण लक्षांत आणून संयम दाखवावा. अशा रीतीनें बँकेस मदत केल्यानें त्यांना स्वतःसहि सहाय होणार आहे."

(ज्वाला बँक लि. ही शेड्यूल्ड बँक १९३८ सालीं स्थापन झाली. तिची मुख्य कचेरी आग्रा येथें असून तिच्या हिंदुस्थानांत मिळून २९ शाखा आहेत.)

**फाळणी आणि विमा-व्यवसाय**—हिंदुस्थानची फाळणी झाल्यानंतर सुमारें १५० हिंदी विमा कंपन्यांच्या शाखा पाकिस्तानांत होत्या. फाळणीमुळें उत्पन्न झालेल्या विमाविषयक प्रश्नांचा दोन्ही वसाहतींच्या प्रतिनिधींनीं नुकताच विचार केला. पाकिस्तानांत काम करणाऱ्या हिंदी कंपन्यांनीं पाकिस्तानांत विमा कायद्याप्रमाणें ठेवावे लागणारे रोखे कोणत्या सरकारचे असावे, हा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे. पाकिस्तानाला भांडवलाची गरज असल्यानें हे रोखे पाकिस्तान सरकारचे असावे असें त्यास वाटतें. उलट सध्यांच्या रोख्यांच्या स्वरूपाच्या ठेवींत उलथापालथ न करतां हें करतां येणें कठीण आहे असें हिंदी विमा कंपन्यांचें मत आहे. अखेरचा निर्णय घेतला जाण्यापूर्वी दोन्ही सरकारांचा सल्ला घेतला जाईल असें समजतें.

## सहकारी चळवळ

**हिंदुस्थानसाठी अखिल भारतीय सहकारी संस्था**—नुकत्याच झालेल्या रजिस्ट्रार्स कॉन्फरन्सनें केलेल्या शिफारशींचा विचार करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें श्री. आर. जी. सरय्या ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक उपसमिति नेमली आहे. रजिस्ट्रार्स कॉन्फरन्स आणि ऑल इंडिआ को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स ह्या दोन संस्था एक करून, एक अखिल भारतीय सहकारी संस्था अगर काँग्रेस अस्तित्वांत आणण्याचा मुख्य प्रश्न ह्या उपसमितीपुढें आहे. ही सूचना सरय्या कमिटीनें केलेली आहे. ह्याशिवाय, रिझर्व्ह बँकेच्या पतीच्या व्यवहाराचा उपयोग शेतीसाठी अधिक प्रमाणांत करतां यावा, म्हणून बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती करण्याचाही प्रश्न उपसमितीपुढें आहे.

**ग्राहकांच्या सहकारी संस्था**—सहकारी चळवळ ह्यापुढें सरकारच्याच पाठिंब्यावर अवलंबून राहिली तर ती यशस्वी होणार नाहीं, असे उद्‌गार मिसेस हंसा मेहता ह्यांनीं ग्राहकांच्या सहकारी संस्थांच्या मध्यवर्ती फेडरशनला उद्देशून नुकतेच काढले. प्रत्येक प्रसंगीं सरकारवर अवलंबून रहाणें चुकीचें होईल असें सांगून त्या पुढें म्हणाल्या कीं ग्राहकांच्या सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर माल खरेदी करूं शकत नाहींत; त्यामुळें त्यांचा व्यापाऱ्यांच्या स्पर्धेपुढें टिकाव लागत नाहीं. ग्राहकांच्या संस्थांनीं एक मध्यवर्ती संस्था काढून आपला मार्ग काढणें इष्ट ठरेल.

**सहकारी गृहसंस्था**—हिंदुस्थान सरकारचे वीज, खाणी व बांधकाम मंत्री श्री. न. वि. गाडगीळ ह्यांनीं दादर कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या इमारतीचा कोनशिला-समारंभ नुकताच साजरा केला. ही इमारतीची जागा दादर भागांतील भवानी शंकर रोडजवळ आहे.

**इन्स्टिट्यूटच्या एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरचा दौरा**—मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर श्री. अ. ग. शेलेकर, ह्यांच्या मे महिन्यांतील दौऱ्याच्या कार्यक्रमांत नगर, पुणें, बोर्डी, धारवाड, बेळगांव, इत्यादि ठिकाणीं भेटींचा समावेश आहे. ता. ११ मे ते महिना अखेर ते ठिकठिकाणच्या सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांस भेटी देतील.

**दि ठाणा पीपल्स को. बँक लि, ठाणें**—वरील बँकेचें उद्घाटन ता. १५ मे रोजीं अर्थ व सहकार मंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें ठाणें येथें होणार आहे. बँकेचें अधिकृत भांडवल २ लक्ष रु. असून श्री. जयंतिलाल त्रिभुवनदास हे बँकेचे चेअरमन आहेत.

**दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, मुंबई**

वरील सोसायटी इंडियन सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं नोंदविण्यांत आली आहे. शिक्षणविषयक प्रश्नांचें संशोधन करणें हा इन्स्टिट्यूटचा प्रमुख उद्देश आहे. इन्स्टिट्यूटच्या १९४८-४९ च्या कार्यक्रमांत एम. एड. च्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग चालविणें, त्यांच्या संशोधनास मार्गदर्शन करणें, हिंदुस्थानांतील शिक्षणाची माहिती देणारें पुस्तक प्रसिद्ध करणें, मुंबई उपनगर जिल्ह्याची शैक्षणिक दृष्ट्या पहाणी करणें, इत्यादि बाबी आहेत. ना. जी. व्ही. मावळंकर हे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष आहेत.


**पूना कमर्शिअल हायस्कूल**

सरकारमान्य एस. एल. सी. परीक्षेचा अभ्यासक्रम.

शॉर्टहँड, टाइपरायटिंग, बुक-कीपिंग असे व्यावहारिक व उपयुक्त विषय. इं. ४ थीत, ५ वीत व ६ इं. पा. पास विद्यार्थ्यांसाठी स्पेशल क्लासांत प्रवेश. नांवनोंदणी चालू.

मुख्याध्यापक,
५९४ बुधवार पेठ, जिजामाता बागेजवळ, पुणें.

## हिंदी आर्थिक जीवनांत जंगलांचें स्थान

मध्यवर्ती सरकारला जंगलांच्या उपयोगाबाबत सल्ला देणाऱ्या ॲडव्हायसरी बोर्डाचें अधिवेशन डेहराडून येथें नुकतेंच भरलें होतें. अधिवेशनांत सरकारचे शेतकी खात्याचे चिटणीस श्री. बी. आर. सेन ह्यांनीं जंगलाविषयीं महत्त्वाचे विचार प्रकट केले. हिंदुस्थानांतील जंगलाविषयींचें धोरण १८९४ सालीं ठरविण्यांत आलें. त्या धोरणाचीं तत्त्वें त्यांनीं मुद्दाम जोर देऊन सांगितलीं, तीं अशीं:—(१) जंगलाची व्यवस्था ठेवतांना पुरापासून रक्षण, जमीन धुपून जाऊं न देणें आणि जंगलें सुकून जाऊं न देणें ह्या बाबींकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. (२) स्थानिक जनतेच्या लांकूड–फाट्याच्या व इमारती लाकडाच्या गरजा भागविण्याइतकें जंगल राखलें गेलेंच पाहिजे. (३) पहिल्या दोन गरजा भागल्या-नंतर मगच जंगलांचा व्यापाराच्या दृष्टीनें उपयोग करूं देण्यांत यावा. हीं तत्त्वें अर्थातच हरकत घेण्यासारखीं नाहींत. पण, तीं अंमलांत आणतांना अडचणी उद्भवतात त्यांचें निराकरण करणें जरूर आहे.

### जंगलांतील लाकूडफाटा व शेतीचें खत

हिंदुस्थानच्या एकूण क्षेत्रफळापैकीं २५ टक्के म्हणजे सुमारें १,५५,००० चौरस मैल जमीन जंगलानें आच्छादलेली आहे. तथापि त्यापैकीं एकतृतियांश जंगल खाजगी अगर स्थानिक रहिवाशांच्या मालकीचें आहे. त्यामुळें जंगलांची नासधूस फार होते. योग्य रीतीनें राखल्या गेलेल्या जंगलांचा हिंदुस्थानांतील प्रदेश एकूण क्षेत्रफळाच्या जेमतेम ११ टक्केच भरेल. जंगलाची व्यवस्था नीटपणें न झाल्यामुळें पूर आणि जमीन धुपून जाणें ह्या दोन्ही आपत्तींची हिंदुस्थानांत वाढ झालेली दिसून येते. डोंगराळ मुलुखांतील व नद्यांच्या उगमाजवळील जंगलांचें ह्या दृष्टीनें रक्षण केलें जाणें आवश्यक आहे. संयुक्त-प्रांत, मुंबई, पश्चिम बंगाल, बिहार आणि ओरिसा ह्या प्रांतांतील कित्येक भागांतून जंगलें मुळींच नाहींत. अर्थातच तेथील स्थानिक जनतेला सर्पणासाठीं लांकूडफाटा मिळणें कठीण जातें. ह्याचा परिणाम असा होतो कीं, गुरांचें शेण लोक सर्पणासाठीं वापरतात. शेतीचा धंदा खतावर अवलंबून असल्यानें शेण सर्पणासाठीं वापरल्यानें जमीन नैट्रोजन-सारख्या महत्त्वाच्या खताला मुकते. सुमारें ३,२०,००० टन शेण अशा रीतीनें जळणासाठीं वापरलें जात असल्यामुळें १० लाख, ७५ हजार टन तांदूळ हिंदुस्थानांत कमी पिकतो असा अंदाज करण्यांत आलेला आहे.

### लाकडाचे विविध उपयोग

व्यापारी दृष्टीनें तर जंगलाचा उपयोग करावा तसा मुळींच केला जात नाहीं. हिंदुस्थानांत चांगल्या टणक लाकडांचा उपयोग रेल्वेच्या रुळाखालीं लागणाऱ्या ओंडक्यासाठींच आजवर मुख्यतः करण्यांत आलेला आहे. तथापि अशा प्रकारच्या लाकूड विशिष्ट प्रकारची रासायनिक क्रिया त्यावर केल्यावर इतरहि अनेक ठिकाणीं वापरतां येतें. बेल्जम, अमेरिका, इंग्लंड सारख्या औद्योगिक देशांतूनही अशा लांकडाचा उपयोग रेल्वेचे पूल, टेलिफोनचे खांब, मोठमोठ्या कारखान्यांचीं छपरें, इत्यादि अनेक कामांसाठीं करण्यांत येतो. हिंदुस्थानांतही पोलादासाठीं अडून न बसतां कित्येक ठिकाणीं लाकडाचा उपयोग करून घेतां येईल. वृत्तपत्रांना लागणारा कागदही हिंदुस्थानांतील जंगलांची राखण व लागवड करून तयार करतां येण्यासारखा आहे.




**दि बँक ऑफ कराड, लि.**

कराड (जि. सातारा)

(स्थापना : १२–३–१९४६)

**पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल.... | १,२५,००० रु. |
| ठेवी .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल.... | १२,२२,००० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर
मॅनेजर




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.